पुणे, वर्ष १, अंक ७ मे २०११ ₹ ३०

# अर्थपूर्ण

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...

स्वाभिमानी, आनंदी, परिपूर्ण जीवनाचा करू स्वीकार; बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशतवादाला देऊ नकार



## काळ्या पैशाने केले राजकारण गिळंकृत

## मध्य-पूर्वेतील धरणीकंप

## डॉलर नावाचे भूत

भूमिका

# ओबामा आणि जगमोहन

**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

कृष्णवर्णीय आफ्रिकन वडील आणि श्वेतवर्णीय अमेरिकन आईचा मुलगा म्हणून जन्म घेतलेल्या बराक ओबामा यांच्या अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवडीने जागतिकीकरणाचे एक वर्तुळ पूर्ण झाले. बराक ओबामा ज्या मुशीत घडले, ते पाहता असा माणूस आर्थिक आणि लष्करी महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवडला जाऊ शकतो हा जगाला एक सुखद धक्का होता. बराक ओबामा मिश्रवर्णीय होते, तसेच ते तेथील मध्यम वर्गातले होते. जगातील मध्यम, निम्नमध्यम, तसेच गरीब वर्गातील माणसे कशी जगतात हे त्यांनी आशियातील इंडोनेशिया आणि आफ्रिकेतील केनियात पाहिले होते. केनियातील त्यांचे नातेवाईक तर दारिद्र्यामुळे शिक्षणही घेऊ शकले नाहीत. त्यात भर म्हणजे आईवडील वेगळे झाले आणि वडिलांच्या केवळ एका महिन्याच्या आणि तेही न कळत्या वयातील सहवासावर बराक ओबामांना आपले आयुष्य उभे करावे लागले. या मुशीत घडलेला माणूस सर्वसत्ताधीश होतो, कारण ती व्यवस्था त्याला त्याची जात, धर्म, वर्ण, वर्ग विचारत नाही, अध्यक्ष होण्यासाठीचे निकष तपासून पाहते व सूत्रे सोपवून मोकळी होते.

आज येथे ओबामांची आठवण येण्याचे एक कारण थोडे वेगळे आहे. ओबामांच्या संपत्तीविषयीची माहिती एप्रिलमध्ये प्रसिद्ध झाली. त्यानुसार नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील त्या कुटुंबाचे उत्पन्न १.७३ दशलक्ष डॉलर (सुमारे ७७० कोटी रु.) आहे. २००९ मध्ये ते ५.५ दशलक्ष डॉलर (सुमारे २५०० कोटी रु.) इतके होते. म्हणजे एका वर्षात ते दोन तृतीयांश कमी झाले! ओबामा यांनी अध्यक्षपदी निवड होण्यापूर्वी काही पुस्तके लिहिली आणि त्याची रॉयल्टी म्हणून मिळालेली रक्कम त्यांच्या उत्पन्नातील सर्वात मोठा वाटा आहे. आता रॉयल्टी कमी झाल्यामुळे उत्पन्न घटले, असे दिसते. (ओबामांनी २०१० मध्ये ४ लाख, ५३ हजार, ७७० डॉलर इतका कर भरला आहे, तर २ लाख, ४५ हजार, ७५ डॉलर इतकी मदत सामाजिक संस्थांना केली आहे.) सर्वसत्ताधीश मानल्या गेलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षाचे उत्पन्न एका वर्षात इतके कमी होऊ शकते, हे धक्कादायकच म्हटले पाहिजे. विशेषतः भारतासारख्या गरीब देशात राजकारणात आणि इतर क्षेत्रांतही ज्या वेगाने अब्जाधीश वाढत चालले आहेत, त्याची तुलना करता हे अविश्वसनीय आहे.

ओबामांसंबंधीची ही आकडेवारी प्रसिद्ध झाली त्याच दरम्यान भारतात काही राज्यांत विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. उमेदवारांनी आपली संपत्ती जाहीर करण्याचा नियम असल्याने नेते संपत्ती जाहीर करत होते. आंध्र प्रदेशचे दिवंगत मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांचे पुत्र जगमोहन रेड्डी यांनीही आपली संपत्ती जाहीर केली. ती होती ४४६ कोटी. धक्कादायक गोष्ट म्हणजे ती सहा वर्षांत ४४६ पट झाली आहे! म्हणजे राजकारणात येण्यापूर्वी म्हणजे २००४ मध्ये त्यांची संपत्ती होती ९ लाख १८ हजार तर राजकारणात येताच ती झाली १ कोटी ७४ लाख! अमेरिका भारतापेक्षा किती श्रीमंत आहे आणि दरडोई उत्पन्नाचा आणि इतर कोणत्याही निकषांवर भारत किती गरीब देश आहे, हे परिमाण ज्यांना समजले आहे, त्याला ही आकडेवारी अस्वस्थ केल्याशिवाय राहणार नाही. १२१ कोटी जनतेमध्ये निम्म्या जनतेचे दररोजचे दरमाणशी उत्पन्न जेथे ७० रुपयांच्या वर जात नाही, तेथे अतिशय गरीब भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे उत्पन्न ४४६ कोटी असू शकते, हे फक्त आपल्याच देशात घडू शकते. जगमोहन यांचे उत्पन्न आजच ओबामांच्या निम्मे आहे, हे लक्षात घ्या आणि असे अनेक 'जगमोहन' आज आमच्या संसदेत, विधानसभेत आहेत.

पण मला आपले लक्ष एका वेगळ्या मुद्द्याकडे वेधायचे आहे. आपले राजकारण, समाजकारण आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांत अर्थकारणाने कुरघोडी केलेली आहे, ती आपण अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेतली पाहिजे, हा तो मुद्दा. याचा अर्थ असा, की राजकारणात जाणारे बहुतांश नेते भ्रष्ट होतात, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. तसाच अनुभव नोकरशाहीविषयीचा आहे आणि तेवढा नसला तरी खासगी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आहे. याचा अर्थ आपल्या लक्षात आला का? ही कोण माणसे आहेत, त्यांना काही नाव नाही, गाव नाही, विशिष्ट पक्ष नाही, जात नाही, धर्म नाही, राज्यही नाही. तरीही ती भ्रष्ट आहेत. याचा अर्थ असा घ्यायचा का, की आमचा समाजच भ्रष्ट आहे. आणि तसे असेल तर




समृद्ध जीवनाचा मंत्र देणाऱ्या या महान संस्कृतीला ही कीड का लागली, हे शोधण्यासाठी या प्रश्नाच्या मुळाशी जाण्याची तयारी करावी लागेल. याचाच दुसरा अर्थ ज्या व्यवस्थेत भ्रष्टाचाराची कीड फोफावते आहे, त्या व्यवस्थेला प्रश्न विचारावे लागतील. केवळ माणसांना प्रश्न विचारून आणि त्यांना धारेवर धरून ही कीड जाणार नाही, हे समजून घ्यावे लागेल. तात्पुरत्या झिंदाबाद-मुर्दाबादने तर या प्रश्नाचे उत्तर कदापि मिळणार नाही.

आज माझ्या देशात अस्तित्वात असलेली व्यवस्था मला प्रामाणिकपणे जगण्याचे बळ देते काय, या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देता येत असेल तर व्यवस्थेला दोष देण्याचे कारण नाही. मग हा समाजच भ्रष्ट आहे, असे आपण जाहीर करून टाकू आणि पकडल्या गेलेल्या माणसाला फाशी देत राहू. त्याला चौकात उभे करून दगड मारू किंवा आजन्म कारावासाची शिक्षा देऊ. भ्रष्ट माणसांनी आमचे तुरुंग भरून टाकू. पण त्याने प्रश्न सुटणार असेल तर! कठोर शिक्षेची तरतूद असणाऱ्या देशातील समाज सुखी झाल्याचे उदाहरण जगात नाही. उलट जग खुले झाल्यामुळे नव्या प्रवाहांनी असे देश ढवळून निघाले आहेत. ते आज माणसे बदलण्याची भाषा करत असले तरी त्यांना व्यवस्था बदलायची आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सुरू केलेला सत्याग्रहही आज माणसे बदलण्याची मागणी करत असला तरी त्याची वाटचाल व्यवस्था बदलण्याच्याच दिशेने असली पाहिजे. १२१ कोटींचा समाज जर सुखासमाधानाने जगायचा असेल तशी व्यवस्था निर्माण करावी लागेल. माणसांवरच अवलंबून राहायचे असेल तर आज आपल्या देशाचे नेतृत्व मनमोहन सिंगांसारखे रिझर्व बँकेचे कार्यकुशल माजी गव्हर्नर करत आहेत. प्रचलित अर्थाने ते काही राजकारणी नाहीत, तरीही त्यांना सध्याच्या व्यवस्थेसमोर हतबल व्हावे लागते आणि भ्रष्टाचार जनतेच्या सहनशक्तीबाहेर गेल्याचे मान्य करावे लागते. 'भ्रष्टाचाराशी लढा देण्यास सध्याचे कायदे, व्यवस्था आणि कार्यपद्धती कुचकामी असल्याची भावना लोकांमध्ये वाढीला लागली आहे,' असेही ते म्हणतात, याचा अर्थ ते माणसांच्या नव्हे तर चांगल्या व्यवस्थेच्या शोधात आहेत.

सर्व काही आहे मात्र ते भ्रष्टाचाराच्या महाकाय राक्षसाने खाऊन टाकले आहे, अशी वेळ भारतीयांवर आली आहे. एक कोटी रुपयांच्या नोटांना वाळवी लागल्याच्या आणि एका अधिकारी दाम्पत्याकडे ३७० कोटी रुपयांची बेहिशोबी संपत्ती (ओबामांच्या संपत्तीच्या निम्मी) सापडण्याच्या घटना दररोजच्या होऊ लागल्या आहेत. कारण आपण सर्व जण ज्या जहाजात बसलो आहोत, त्या जहाजाचे भवितव्य तेच आपल्या सर्वांचे भवितव्य हे आपण विसरतो आहोत. एकमेकांकडे बोटे दाखवून, एकमेकांचा राग करून आपण मूळ मुद्द्याला हात घालायला तयार होत नाही. एक प्रकारे गाडी आतून चकाचक करण्यावर आणि आपापली जागा सुशोभित करण्यावर आपला जोर आहे, मात्र ज्या चाकांवर ती चालते, त्यांच्याकडे आपले लक्ष नाही.

लोकशाहीत राजकारणाचा वरचष्मा असलाच पाहिजे, याविषयी कोणाच्या मनात शंका असण्याचे कारण नाही, मात्र या राजकारणावर अर्थकारण कशी कुरघोडी करते, हे आज आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. राजकारणाला पैशाच्या किडीने कसे पोखरून टाकले आहे, याविषयी या 'अर्थपूर्ण'मध्ये आपल्याला वाचायला मिळेल. ही कीड नष्ट करण्यासाठी अर्थक्रांतीने 'स्टेट फंडिंग'चा पर्याय सांगितला आहे, त्याची यानिमित्ताने चर्चा व्हावी, अशी अपेक्षा आहे. आज भारतीय नागरिक ज्या व्यवस्थेच्या शोधात आहेत, ती व्यवस्था अर्थक्रांतीने सांगितली आहे. ज्यांना या व्यवस्थेविषयी काही शंका आहेत, त्या सर्वांसाठीही हे व्यासपीठ खुले आहे. १२१ कोटी माणसे बसलेले जहाज माणसांच्या चांगुलपणावर चालवायचे, की सर्वांना माणूस म्हणून न्याय देणाऱ्या व्यवस्थेच्या हातात त्याचे नियंत्रण सोपवायचे, याची चर्चा केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही.